**परराष्ट्र सचिव श्री. विक्रम मिस्त्री यांची नेपाळ भेट (17-18 ऑगस्ट 2025)**

18 ऑगस्ट 2025

नेपाळचे परराष्ट्र सचिव श्री. अमृत बहादूर राय यांच्या आमंत्रणावरून भारताचे परराष्ट्र सचिव श्री. विक्रम मिस्री यांनी 17-18 ऑगस्ट 2025 रोजी नेपाळला औपचारिक भेट दिली.

2. परराष्ट्र सचिवांनी नेपाळचे राष्ट्रपती महामहिम श्री. रामचंद्र पौडेल, नेपाळचे पंतप्रधान महामहिम श्री. के. पी. शर्मा ओली आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री महामहिम डॉ. आरझू राणा देउबा यांची सौजन्यभेट घेतली. त्यांनी नेपाळच्या नेतृत्वाला भारतातील नेतृत्वाकडून शुभेच्छा दिल्या आणि उभय देशांमध्ये परस्पर लाभदायक द्विपक्षीय सहकार्याच्या विविध क्षेत्रांमध्ये होत असलेल्या प्रगतीची माहिती दिली.

3. परराष्ट्र सचिवांनी नेपाळचे पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांना भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्याकडून भारत दौऱ्याचे औपचारिक आमंत्रण सुपूर्द केले, जो परस्पर सोयीस्कर तारखांना आयोजित करण्यात येईल.

4. दोन्ही परराष्ट्र सचिवांमध्ये व्यापक चर्चा झाली, विविध द्विपक्षीय उपक्रमांमध्ये झालेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला आणि भविष्यातील सहकार्याच्या संधींवर चर्चा करण्यात आली. यामध्ये पंतप्रधान ओली यांच्या आगामी भारत दौऱ्याच्या अजेंडामध्ये समाविष्ट करता येऊ शकणाऱ्या संभाव्य फलनिष्पत्तींचा देखील विचार करण्यात आला.

5. परराष्ट्र सचिवांनी नेपाळचे लष्करप्रमुख जनरल अशोक राज सिग्देल यांची भेट घेतली आणि नेपाळी लष्कराला संरक्षण सामग्री आणि उपकरणे सुपूर्द केली. यामध्ये लाईट स्ट्राईक वाहने (LSVs), अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणे आणि लष्करी प्राणी यांचा समावेश होता.

6. विविध बैठकांदरम्यान, उभय बाजूंनी भौतिक संपर्क, डिजिटल संपर्क, संरक्षण आणि सुरक्षा तसेच ऊर्जा सहकार्य यांसारख्या विविध द्विपक्षीय सहकार्याच्या क्षेत्रांमध्ये अलीकडच्या काही वर्षांत झालेल्या ठोस प्रगतीचा समाधानपूर्वक उल्लेख केला.

7. परराष्ट्र सचिवांनी नेपाळच्या इतर वरिष्ठ राजकीय नेत्यांचीही भेट घेतली.

8. नेपाळ हा भारताच्या 'शेजारधर्म प्रथम' धोरणाअंतर्गत त्याचा अग्रक्रमी भागीदार आहे. परराष्ट्र सचिवांची भेट ही उभय देशांमधील नियमित उच्च-स्तरीय भेटीगाठींच्या परंपरेचा एक भाग होती आणि या भेटीमुळे द्विपक्षीय संबंध आणखी पुढे नेण्यास मदत झाली.

**नवी दिल्ली**

**18 ऑगस्ट 2025**